# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक १४८ वा शुक्रवार दि.०३ नोव्हेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







# चोरलेला पैसा काँग्रेस परत आणणार

हैदराबाद : काँग्रेसचे खासदार राहुल गांधी तेलंगणामध्ये निवडणूक दौ-यावर आहेत. गुरुवार दि. २ नोव्हेंबर रोजी त्यांनी आंबटपल्ली येथे जाहीर सभेला संबोधित केले. यादरम्यान राहुल म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री केसीआर यांनी जनतेचा जितका पैसा लुटला आहे, तितका पैसा काँग्रेस सर्वांना परत करेल. राहुल गांधी म्हणाले की महिला राज्याच्या भविष्याची काळजी घेतात. आमच्या मुलांची काळजी घेतात. तेलंगणात काँग्रेसचे सरकार आल्यास महिलांच्या बँक खात्यात दरमहा २५०० रुपये पाठवले जातील. १००० रुपयांचा सिलिंडर ५०० रुपयांना मिळणार आहे. महिलांना



सार्वजनिक बसमधून मोफत प्रवास करता येणार आहे. त्यांच्या प्रवासासाठी ५०० ते १००० रुपये वाचणार आहेत. अशा प्रकारे महिलांना दरमहा ४००० रुपयांचा लाभ मिळणार आहे. याआधी बुधवारीही राहुल यांनी मुख्यमंत्री केसीआर यांच्यावर हल्लाबोल केला होता. कालवकुर्तीमध्ये जाहीर सभेला संबोधित करताना काँग्रेस नेते म्हणाले की मी नरेंद्र मोदी नाही. जेव्हा मी वचन देतो तेव्हा मी ते पूर्ण करतो.ओबीसी मुख्यमंत्री करू भाजपचे नेते इथे येऊन सांगतात की आम्ही ओबीसी मुख्यमंत्री करू. अरे भाई! इथे तुम्हाला २% मते मिळतील, मुख्यमंत्री कसा बनवणार? केसीआर आधी मुख्यमंत्रिपदाला बाय-बाय म्हणतील, त्यानंतर त्यांना जनतेच्या लुटलेल्या पैशावर प्रश्न विचारले जातील.

# मोईत्रा यांनी सभापती व सदस्यांविरुद्ध अपशब्द वापरले : विनोद सोनकर

नवी दिल्ली : संसदेच्या आचार समितीच्या बैठकीत गुरुवारी मोठा गदारोळ झाला आहे. तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांच्यासह विरोधीपक्षांचे खासदार आचार समितीची बैठक अर्धवट सोडून निघून गेले. महुआ मोईत्रा यांना वैयक्तिक आणि अनैतिक प्रश्न विचारण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. आचार समितीचे अध्यक्ष विनोद सोनकर यांनी या आरोपांबाबत उत्तर दिले आहे. विनोद सोनकर म्हणाले की, प्रश्नांना उत्तरे देण्याऐवजी महुआ मोईत्रा संतप्त झाल्या आणि त्यांनी सभापती व समिती सदस्यांविरुद्ध अपशब्द वापरले. खासदार दानिश अली, गिरधारी यादव आणि रेड्डी यांनी समितीला दोष देण्याचा प्रयत्न केला आणि सभात्याग केला. या विषयावर समिती पुन्हा बसून पुढील कारवाईचा निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.दानिश अली यांनी समितीमध्ये विचारलेल्या वैयक्तिक






प्रश्नांना 'द्रौपदीची विटंबना' असे संबोधले होते, असे पत्रकारांनी सांगताच सभापती विनोद सोनकर म्हणाले की, त्यांच्याशी संबंधित असलेले प्रश्न टाळण्यासाठी असे आरोप करण्यात आले आहेत.

# ७ ऑक्टोबरसारखे हल्ले पुन्हा पुन्हा करू

उत्तर गाझा : इस्त्रायलवर वारंवार ७ ऑक्टोबर प्रमाणे हल्ले करणार असल्याचे हमासने म्हटले आहे. इस्त्रायलला त्यांच्या भूमीवर स्थान नाही. हमास पॉलिटिकल ब्युरोचे सदस्य आणि प्रवक्ते गाझी हमद यांनी लेबनीज चॅनेल एलबीसी २४ ला एक मुलाखत दिली, जी बुधवारी मध्य पूर्व मीडिया रिसर्च इन्स्टिट्यूटने प्रसिद्ध केली.यामध्ये हमास कमांडर म्हणाले की आम्हाला इस्त्रायलला धडा शिकवावा लागेल आणि आम्ही ते पुन्हा पुन्हा करू. अल-अक्सा फ्लड ऑपरेशन ही फक्त सुरुवात आहे. आम्ही ७ ऑक्टोबर प्रमाणे दोन, तीन आणि अगदी चार वेळा हल्ला करू. इस्त्रायलचे अस्तित्व मूर्खपणाचे आहे आणि आम्ही ते सर्व पॅलेस्टिनी भूमीतून (वेस्ट बँक, गोलान हाइट्स) पुसून टाकू. हमाद पुढे म्हणाले की इस्त्रायलचे अस्तित्व अरब आणि इस्लामिक देशांच्या सुरक्षा, सैन्य आणि राजकारणासाठी आपत्ती आहे. हे सांगायला आम्हाला लाज वाटत नाही. या युद्धाचीकिंमतही आम्हाला चुकवावी लागेल आणि त्यासाठी



आम्ही तयार आहोत. पॅलेस्टाईनला शहीदांचा देश म्हटले जाते आणि शहीदांच्या बलिदानाचा आम्हाला अभिमान आहे.नागरिकांचे नुकसान हेतू नव्हे हमास कमांडर म्हणाले की आम्ही ७५ वर्षांपासून इस्त्रायलच्या ताब्याचे बळी आहोत. यामुळे आम्ही जे काही केले त्याचा आरोप करता येणार नाही. ७ ऑक्टोबर, १० ऑक्टोबर किंवा इतर कोणत्याही तारखेला जे काही घडले ते सत्य आहे. नागरिकांचे नुकसान करण्याचा हमासचा कधीही हेतू नव्हता. पण जमिनीवरील हल्ल्यात अनेक अडचणी आल्या.

# खलिस्तानी दहशतवादी पुन्हा सक्रिय; शस्त्रास्त्रांची तस्करी करण्याचे

चंदीगड : खलिस्तानी दहशतवाद्यांच्या मुद्यावरून भारत आणि कॅनडामध्ये वाद सुरु आहे. हा वाद शिगेला पोहचला असून भारताने खलिस्थानी दहशवाद्यांविरुद्ध कठोर भूमिका घेतली आहे. या प्रकरणात भारत कॅनडावर दवाब टाकत आहे. दरम्यान, फुटीरतावादी दहशतवादाला खतपाणी घालण्याच्या पाकिस्तानच्या हालचालींचा सुरक्षा दलांनी पर्दाफाश केला आहे. तसेच पंजाबमध्ये खलिस्तानी दहशतवादी पुन्हा सक्रिय झाले आहेत. ड्रोनच्या माध्यमातून भारतात ड्रग्ज आणि शस्त्रास्त्रांची तस्करी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे सुरक्षा अधिकाऱ्यांनी माध्यमांना सांगितले आहे. दहशतवादी ड्रग्ज आणि शस्त्रास्त्रांचा वापर देशविरोधी कारवायांमध्ये करतात. ऑक्टोबर महिन्यात पाकिस्तानातून पंजामधील तरनतारनमध्ये घुसलेले ड्रोन चार वेळा पाडण्यात आले आहेत. ड्रोनद्वारे शस्त्रे आणि ड्रग्सची तस्करी करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. गेल्या काही वर्षांत, पंजाब तरनतारनमध्ये बहुतेक वेळा असे ड्रोन पाडले गेले आहेत, जे दहशतवाद्यांच्या मदतीसाठी भारतात घुसले होते. पाकिस्तानच्या या नव्या हालचालीची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा यंत्रणा सावध झाल्या आहेत. पंजाबमध्ये ही खेप मिळवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या खलिस्थानी दहशवाद्यांचा आणि एजंटचा सुरक्षा यंत्रणा शोध घेत आहेत. पाकिस्तानचा हा डाव हाणून पाडण्यासाठी या भागात ड्रोनविरोधी तंत्रज्ञान विकसित करण्यात आले असून स्थानिक पोलिसांसोबत विशेष मोहीमही राबवण्यात आली आहे. सुरक्षा यंत्रणांसाठी मोठ्या चिंतेचे कारण हे आहे की, गेल्या एका महिन्यात तरनतारनजवळ अमृतसरमध्ये असेच ड्रोन सापडले आहेत.

# अमित शहांच्या रॅलीत स्टेजकडे बूट फेकला

कर्नाल : हरियाणाच्या कर्नालमध्ये अंत्योदय महासंमेलनाला पोहोचलेल्या केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या रॅलीत एका व्यक्तीने स्टेजच्या दिशेने बूट फेकला. शहा भाषण संपवून मंचावरून बाहेर पडत असताना ही घटना घडली. बूट फेकणारी व्यक्ती अपंग असून सरकारी योजनांच्या लाभार्थ्यांमध्ये बसली होती. रवींद्र सिंग असे त्याचे नाव असून तो कुरुक्षेत्रचा रहिवासी आहे. मात्र, स्टेजपासून बरेच अंतर असल्याने त्याचा बूट स्टेज समोरील डीमध्ये पडला.या घटनेनंतर घटनास्थळी उपस्थित असलेल्या पोलिसांनी तातडीने रवींद्र सिंगला ताब्यात घेतले. यादरम्यान रवींद्रने सांगितले की, हरियाणा सरकारने त्यांचे अपंगत्व निवृत्ती वेतन बंद केले आहे आणि त्यामुळेच त्यांनी हे पाऊल उचलले आहे. सध्या त्यांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात येत आहे. तत्पूर्वी, मेगा परिषदेचे उद्घाटन करताना शहा म्हणाले की, १ जानेवारीपासून राज्यातील वृद्धांना ३,००० रुपये वृद्धत्व निवृत्ती वेतन मिळणार आहे. याशिवाय मुख्यमंत्री तीर्थस्थान योजनेंतर्गत ६० वर्षांवरील वृद्धांना मोफत तीर्थयात्रा उपलब्ध करून दिली



जाणार आहे. याशिवाय अंत्योदय कुटुंबांनाही रस्त्यावरील मोफत प्रवासाचा लाभ दिला जाणार आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेचा नागरिकांनी लाभ घ्यावा - आयुक्त बाबासाहेब मनोहरे

लातूर/प्रतिनिधी:- प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लातूर शहरात पूर्वी ४८०८ घरकुले मंजूर झालेली असून आता नव्याने १२२३ लाभधारकांचा प्रस्ताव शासनाकडून मंजूर झाला आहे.शहरातील नागरिकांनी या योजनेचा लाभ घेत लवकरात लवकर बांधकामे सुरू करावीत,असे आवाहन आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.



प्रधानमंत्री आवास योजना ही केंद्र शासन पुरस्कृत योजना असून लातूर शहर महानगरपालिके मार्फत ती राबविण्यात येते.या योजनेअंतर्गत ज्यांच्याकडे स्वतःची जागा आहे परंतु पक्के घर नाही व ज्यांचे वार्षिक उत्पन्न रूपये ३.०० लक्ष च्या आत आहे अशा नागरिकांना लाभ देण्यात येतो.यात लाभधारकाने बांधकाम स्वतः करून घ्यावयाचे आहे.त्यासाठी टप्प्याटप्प्याने २.५० लक्ष रुपयांचे अनुदान दिले जाते.

आतापर्यंत शहरात या योजनेतून ४८०८ घरकुले मंजूर झाली असून त्यापैकी ३८७७ लाभधारकांनी घरकुलाचे काम सुरू केले आहे. यापैकी २७७१ बांधकामे पूर्ण झाली असून ११०६ घरकुलांची कामे सुरू आहेत.

मनपाने मार्च २०२३ मध्ये १२२३ लाभधारकांच्या घरकुलाचा प्रस्ताव नव्याने शासनाकडे सादर केला होता.तो देखील मंजूर झाला आहे.या योजनेअंतर्गत आतापर्यंत १०३ कोटी २ लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला असून त्यापैकी ८४ कोटी ७१ लक्ष रुपये खर्च करण्यात आले आहेत. उर्वरित निधी खर्च करण्याची कार्यवाही सुरू आहे.

ज्या लाभधारकांनी अद्याप घरकुलाचे काम सुरू केलेले नाही त्यांनी कागदपत्रांची पूर्तता करून कामे सुरू करावीत.विहित कालावधीत बांधकाम पूर्ण करून घेऊन योजनेचा लाभ घ्यावा. लाभधारकांनी काम सुरू केले नाही तर मंजूर झालेले घरकुल रद्द करण्याची कार्यवाही प्रशासनाकडून केली जाईल,अशी माहितीही आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी दिली.

# बाँडमधील गोपनीयतेमुळे सर्वांना समान संधी नाही

नवी दिल्ली : इलेक्टोरल बाँड योजना निवडक (सिलेक्टिव्ह) गोपनीयता देते, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. बाँडच्या वैधतेला आव्हान देणा-या याचिकांवर कोर्ट सुनावणी घेत आहे. बुधवारी झालेल्या सुनावणीत सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील घटनापीठ म्हणाले, बाँडद्वारे मिळालेले राजकीय दान गुप्त कसे? बाँड खरेदी करणारे व बाँड मिळवणा-याचा संपूर्ण तपशील स्टेट बँक ऑफ इंडियाकडे (एसबीआय) असतो. हा तपशील सरकारी तपास यंत्रणा (सीबीआय, आयकर, ईडी) मिळवू शकतात.सरन्यायाधीश म्हणाले, पारदर्शकता नसल्याने बाँड योजना सर्व पक्षांना समान संधी देत नाही. सत्ताधारी पक्षाला देणगीदारांचा तपशील मिळू शकतो, पण विरोधी पक्षांना मिळत नाही. योजनेचा उद्देश चांगला असू शकतो, पण राजकीय देणगीत पांढरा पैसा आणण्याच्या या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव आहे. दरम्यान सुनावणी गुरुवारीदेखील सुरूच होती.बाँडद्वारे किती रक्क मिळाली हे सांगावे सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील पीठाने निवडणूक आयोगाला विचारले की, साधारणतः



सार्वत्रिक आणि विधानसभा निवडणुकीसाठी किती खर्च येतो. तसेच पक्षांना बाँडच्या माध्यमातून किती रक्कम मिळाली व किती खर्च झाली, हेही आयोगाने सांगावे. न्या. खन्ना म्हणाले, पुढील सुनावणीतही बाँडच्या गोपनीयतेचा मुद्दा येईल. म्हणून हे जाणून घेणे गरजेचे आहे. त्यावर सॉलिसिटर जनरल मेहता म्हणाले, गोपनीयतेवर सर्वोच्च न्यायालयात व्यवस्था देऊ शकतो.

काय झाले न्यायालयात? सरन्यायाधीश म्हणाले की स्वतःच्या नावाने बाँड खरेदी केल्यावर एसबीआयच्या अकाउंट बुकमध्ये आल्यानंतर ते इतरांच्या नावेच बाँड खरेदी करतील, हे मोठ्या दात्यांना माहीत आहे. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की याचिकाकर्ते भलेही यास अपारदर्शक व गोपनीय म्हणत नसतील, पण ही योजना गोपनीयता लक्षात घेऊनच बनवली आहे. न्या. खन्ना म्हणाले इलेक्टोरल बाँड्सद्वारे राजकीय देणग्यांकडे रोखीचा ओघ कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. आम्ही या मुद्यावर तुमच्या सोबत आहोत. तर न्या. गवई म्हणाले इलेक्टोरल बाँड योजना कशी असावी, हा सरकारला सांगण्याचा आमचा प्रयत्न मुळीच नाही. आमचे म्हणणे आहे की, या योजनेमुळे पांढरा पैसा राजकीय देणगीच्या प्रक्रियेत आला आहे का? मेहता म्हणाले हा विश्वासाचा मुद्दा आहे. आम्हाला कुणावर तरी विश्वास ठेवावा लागेल. बाँडबाबत केंद्र सरकारलाही कळू शकत नाही.

## संपादकीय....

# काँग्रेसाध्यक्षांची वर्षपूर्ती..

योग्य समन्वय, संवाद आणि अनुभवाच्या बळावर त्यांनी कर्नाटकात भाजपचा पराभव करून गोंधळलेल्या काँग्रेसला सूर मिळवून दिला. चेतन शिंदे काँग्रेसचे नवे अध्यक्ष रबरस्टॅम्पप्रमाणे काम करतील हा विरोधकांचा आणि पत्रकारांचा दावा यांनी खोटा ठरवला आहे. त्यांच्या सर्वसमावेशक नेतृत्वाखाली गेल्या वर्षभरात काँग्रेसला नवा सूर सापडू लागला आहे. नरेंद्र मोदींच्या वादळात दिशा भरकटलेल्या काँग्रेसने गेल्या वर्षी २६ ऑक्टोबर २०२२ रोजी दक्षिण भारतातील दलित समाजातून आलेल्या, ५० वर्षांच्या प्रदीर्घ राजकीय, सामाजिक, प्रशासकीय कामकाजाचा अनुभव असणाऱ्या स्वच्छ प्रतिमेच्या मल्लिकार्जुन खरगे यांना गांधी कुटुंबाबाहेरचे अध्यक्ष म्हणून निवडले. पराभूत मानसिकतेत असणाऱ्या या पक्षाला खरगे यांनी सर्वसमावेशक नेतृत्व आणि कौशल्याच्या बळावर विश्वास गेल्या वर्षभरात दिला. योग्य समन्वय, संवाद आणि अनुभवाच्या बळावर त्यांनी कर्नाटकात भाजपचा पराभव करून गोंधळलेल्या काँग्रेसला सूर मिळवून दिला. काँग्रेस पक्ष मोदी-शहा यांना टक्कर देऊ शकतो, ही उमेद दिली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या गांधी-नेहरूंच्या १३८ वर्षीय काँग्रेसला नामशेष करण्याच्या आरोळ्या पंतप्रधानदेखील प्रचारसभांतून देत असताना, खरगेंनी दक्षिण भारतातल्या एकमेव राज्यातून भाजपला मुक्त केले आणि काँग्रेस जिवंत राहील हे कृतीतून दाखवून दिले.अनेक वेळा अनेकांनी काँग्रेसवर गांधी कुटुंबाच्या घराणेशाहीचा आरोप केला आहे. मात्र गेल्या दशकभरात, भाजपच्या आरोपांनी काँग्रेस पहिल्यांदाच कधी नव्हे एवढी घायाळ झाली. विशेषत: २०१९ नंतर मोदी-शहांच्या आक्रमक राजकारणामुळे विरोधी पक्षांची अवस्था केविलवाणी झाली. मोदींनी भल्याबुऱ्या पद्धतीने सत्ता राबवून अन्य पक्षीयांना जेरीस आणले. अनेकांना तुरुंगात पाठवले, अनेकांची संपत्ती गोठवली, तपासयंत्रणांकडून नोटिसा धाडल्या, धाडी घातल्या, अनेक राज्यांतील सरकारे पाडून भाजपला त्या त्या राज्यात सत्ता मिळवून दिली. अनेकांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले. याचा सर्वाधिक परिणाम काँग्रेसवर झाला. काँग्रेसमधील अनेक 'धनवान' नेतेमंडळी भाजपच्या 'वॉशिंग मशीन'मधून पवित्र होण्याची धडपड करू लागली होती. ज्योतिरादित्य सिंदिया, हेमंत बिस्वा सरमा, जगदम्बिका पाल, चौधरी बिरेंद्र सिंह, एस. एम. कृष्णा यांच्यासारखे कधीकाळचे काँग्रेसनिष्ठ पक्षनेतृत्वावर आरोप करून भाजपत गेले. काही नेते जी-२३ सारखा गट तयार करत होते. पक्षाला लोकसभेत, विविध राज्यांच्या विधानसभेत यश मिळत नव्हते. अशा संकटकाळात काँग्रेसला तारण्याचे मोठे शिवधनुष्य काँग्रेसच्या नऊ हजार ५४८ मतदारांपैकी सात हजार ८९७ मतदारांनी, काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी खरगेंच्या खांद्यावर दिले. खरगेंनीही वर्षभरात आपल्या सर्वसमावेशक नेतृत्वकौशल्याने काँग्रेसला कूस बदलण्यास भाग पाडले आहे. खरगे पक्षाध्यक्ष झाल्यानंतरच भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या गृहराज्यात हिमाचल प्रदेशात प्रियंका गांधी आणि खरगेंच्या मेहनतीने राज्याला काँग्रेसचा मुख्यमंत्री मिळाला. खरगेंनी स्वत:च्या गृहराज्यात, कर्नाटकात भाजपचा दारुण पराभव केला. काँग्रेस गटबाजीने पोखरली आहे, ही चर्चा शिखरावर असताना कर्नाटकातील डी. के. शिवकुमार आणि सिद्धरमय्या यांच्यात खरगेंनी योग्य समन्वय केला. राजस्थानात अशोक गेहलोत आणि सचिन पायलट, छत्तीसगढमध्ये भूपेश बघेल आणि टी. एस. देव यांच्यात यशस्वी सामोपचार घडवला. मध्य प्रदेशात स्थानिक नेतृत्वाला सर्वाधिकार देत स्वतंत्रपणे निवडणूक लढण्याची मुभा दिली. त्यांनी आज छत्तीसगढ, मध्य प्रदेश, राजस्थानात काँग्रेस जिंकेल अशा स्थितीत पक्ष उभा केला आहे. तेलंगणासारख्या राज्यात पक्षाला प्रमुख प्रतिस्पर्ध्याच्या तुलनेत उभे केले आहे. काँग्रेसनिष्ठ विचारांची पक्की बैठक असलेल्या खरगेंनी आपल्या नीतिमत्तेच्या बळावर राजकारण केले. कर्नाटकात त्यांची मुख्यमंत्रीपदाची संधी पक्षनेतृत्वाने तीन वेळा घालवली. अशाही परिस्थितीत खरगेंनी पक्षाला कधीही दुय्यम स्थान दिले नाही. काँग्रेसचा विचार, सामाजिक न्यायाची भूमिका, स्पष्टवक्तेपणा, भाजपच्या आक्रमक राजकारणाला थेटपणे भिडण्याचा स्वभाव, तटस्थपणा, कुठल्याही दबावाला बळी न पडता संसदेत आणि संसदेबाहेर भाजपला टोचतील असे प्रश्न विचारण्याचा खमकेपणा त्यांचे राजकारण अधिक प्रगल्भ करतो. त्यांनी पक्षात दिलेले योगदान, बाळगलेली निष्ठा ५१ वर्षांच्या प्रदीर्घ राजकीय जीवनात कधीही भ्रष्टाचाराचा आरोप न झालेली त्यांची स्वच्छ प्रतिमा, त्यांचे पक्षातील नैतिक अधिष्ठान वाढवते. त्याच नैतिकतेच्या बळावर खरगेंनी काँग्रेसला हळुवारपणे हवे तसे बदलण्याचा प्रयत्न चालवला आहे. त्या प्रयत्नाचा भाग म्हणूनच आज देशात होत असलेल्या पाच राज्यांच्या निवडणुकीत काँग्रेस एकसंधपणे मोठ्या विश्वासाने निवडणुकीला सामोरा जात आहे. विरोधकांच्या इंडिया आघाडीत काँग्रेसला त्यांनी केंद्रस्थानी आणले आहे.खरे तर, काँग्रेसचे नवे अध्यक्ष रबरस्टॅम्पप्रमाणे काम करतील हा विरोधकांचा आणि पत्रकारांचा दावा खरगेंनी खोटा ठरवला आहे. अध्यक्षपदाच्या निवडीसाठी उमेदवारी अर्ज भरतानाच त्यांनी आपल्या सर्वसमावेशक बहुआयामी नेतृत्वाची छाप राष्ट्रीय राजकारणात पाडली होती. जी-२३ गटाची वर्षभर होत असलेली चर्चा खरगेंनी उमेदवारी अर्ज भरतानाच संपवली. सर्वांना सोबत घेऊन ते विजयी झाले. अध्यक्षपदाचा स्वीकार केल्यानंतर त्यांनी पक्षातील अनेक वादविवाद मिटवले. वाचाळवीरांना गप्प केले. पक्षात शिस्त आणि निष्ठा, पक्षवाढीचे काम याला महत्त्व दिले. गटबाजी मोडीत काढण्याचे काम केले. तेलंगणात राहुल गांधींच्या जवळचे समजले जाणारे मणिकम टागोर यांना गोव्याला पाठवून त्यांनी महाराष्ट्रातील माणिकराव ठाकरे यांची नव्याने तेलंगणाचे प्रभारी म्हणून नियुक्ती केली. एवढेच नव्हे, तर टागोर यांनी तेलंगणात ज्या ए. रेवंत रेड्डींना काढण्याचे ठरवले त्यांनाच खरगेंनी तेथील प्रमुख बनवले. काँग्रेसच्या नवनियुक्त समितीत शशी थरूर यांना स्थान दिले. चंद्रकांत हंडोरे, मनीष तिवारी, नासीर हुसेन, यशोमती ठाकूर, सचिन पायलट, रमेश चेन्नीथला, के. राजू इत्यादी नेत्यांना त्यांनी संधी दिली. उदयपूरच्या अधिवेशनात अनेक नवे ठराव संमत केले. या वेळी अध्यक्ष म्हणून त्यांच्या कामकाजात कोणी हस्तक्षेप केल्याचे जाणवले नाही.राहुल गांधींच्या आतील गोटातील लोक पक्ष ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत असले तरी खरगे ती संधी त्यांना देत नाहीत. ते आपल्या स्वतंत्र प्रतिभेने, विचाराने सर्वांना सामील करून घेत पुढे चालत असल्याचे दिसते. म्हणूनच काँग्रेसचे हायकमांड असणारा पूर्ण गांधी परिवार अध्यक्ष म्हणून खरगेंच्या सन्मानाचा शिष्टाचार पाळत आहे. खरगेंनी घेतलेले निर्णय, पक्षाला केलेले मार्गदर्शन ते स्वीकारत असल्याचे सिद्ध होत आहे. सार्वजनिक ठिकाणी, सभा-संमेलनांत, कार्यक्रमांत गांधी परिवार विशेषत: राहुल गांधी खरगेंचा अतीव आदर करत असल्याचे दिसून येते. बदलत्या राहुल गांधींमध्ये खरगेंच्या मार्गदर्शनाचा प्रभाव दिसून यायला लागला आहे. राहुल गांधी आज पक्षाचे अध्यक्ष असते, तर इंडिया आघाडी केवळ कल्पना ठरली असती. त्यांचे वय आणि प्रतिमा पाहता नितीशकुमार, शरद पवार, ममता बॅनर्जी, अरविंद केजरीवाल यांच्यासारख्या नेत्यांनी त्यांच्यासोबत आघाडीची चर्चाही केली नसती. मात्र ८० वर्षे पार केलेल्या खरगेंनी नितीशकुमारांची संकल्पना सोबत घेऊन इंडिया आघाडीत जीव आणला आहे. राहुल गांधी इंडिया आघाडीच्या नेत्यांशी संवाद करतात, राज्याराज्यांतील प्रादेशिक पक्षांची ताकद मान्य करतात, जागा वाटपात काँग्रेस लवचीक भूमिका घेईल असे पाटण्यात पत्रकारांना सांगतात.

# राम मंदिराच्या उद्घाटनाचा भाजपला कसा फायदा मिळू शकतो?

आगामी लोकसभा निवडणुकांसाठी इंडिया आघाडीतील घटक पक्षांची जातीआधारित सर्वेक्षणाच्या मागणीवर भिस्त असली तरी राम मंदिराच्या उद्घाटनापुढे तो मुद्दा निष्प्रभ ठरेल अशी शक्यता आहे. रामजन्मभूमीच्या मुद्द्याने १९९० च्या दशकात भारतीय राजकारणात उलथापालथ घडवली होती. येत्या २२ जानेवारी २०२४ रोजी या मुद्द्याने एक प्रकारचा कळस गाठलेला दिसेल. अनेक बातम्यांनुसार, त्या दिवशी एका मोठ्या सोहळ्यात अयोध्येतील मंदिरात रामाच्या मूर्तीची स्थापना केली जाणार आहे. वेगवेगळ्या १३६ सनातन परंपरांमधील हजारो धार्मिक नेते या कार्यक्रमाला उपस्थित असतील. या घटनेचा यापुढच्या काळातील देशातील राजकारण आणि समाजावर दीर्घकालीन परिणाम होणार आहे.२०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या काही महिने आधी हे उद्घाटन होत आहे. सत्ताधारी पक्ष आणि सरकार समाजमाध्यमे तसेच पारंपरिक माध्यमांचा वापर करून मंदिराचे प्रतीक आणि संदेश देशाच्या कानाकोपऱ्यात नेण्याचा प्रयत्न करतील. अलीकडेच, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी देशभरातील लोकांना त्यांनी आपापल्या घराजवळील मंदिरांमध्ये हा उत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यांच्याशी जोडलेल्या विश्व हिंदू परिषदेसारख्या संघटना या सोहळ्याचे 'लोकोत्सवा'मध्ये रुपांतर करण्यासाठी किती कठोर मेहनत घेतील, हे यातून लक्षात येते. हा सोहळा लोकांच्या मनावर कायमचा ठसवला जावा, त्यांना त्याचा अभिमान वाटावा यासाठी सगळे प्रयत्न केले जातील. हिंदू मतदार म्हणून उदयास आलेला वर्ग आणि या वर्गाच्या वर्तनावर व मानसिकतेवर रामजन्मभूमी मंदिर उद्घाटनासारख्या घटनांचा सामाजिक आणि राजकीय परिणाम जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. हे उद्घाटन ही एक स्वतंत्र घटना म्हणून वेगळी काढता येणार नाही. हा गेल्या किमान तीन दशकांतील विविध घटनांच्या मालिकेचा आणि त्यातून निर्माण झालेल्या राजकीय मानसिकतेचा एक भाग आहे. रामाच्या स्मृती या घटकात असलेली जबरदस्त क्षमता आपण गेल्या काही वर्षांत अनुभवली आहे. या घटकात हिंदूंच्या एकत्रिकरणाचा हेतू मोठ्या प्रमाणात साध्य करण्याची, जाती-वर्गांपलीकडे जाऊन हिंदूंना एकत्र आणण्याची आणि त्याद्वारे भाजपला राष्ट्रीय स्तरावर महत्त्वाचे स्थान मिळवून देण्याची क्षमता आहे.

याव्यतिरिक्त राममंदिराच्या आवारात रामायणात नमूद असलेले शिव, गणपती, हनुमान इत्यादी देव विविध संत आणि शबरी, जटायू, वाल्मिकी इत्यादी देवतांचीही मंदिरे उभारण्यात येणार आहेत. हे देव, देवता, संत विविध उपेक्षित वर्गांना वंदनीय आहेत. त्यामुळे प्रतिकात्मकतेतून सर्वसमावेशकतेचे एक कथ्य (नॅरेटिव्ह) प्रस्थापित केले जाऊ शकते. त्यामध्ये राजकीय लाभ मिळवून देण्याची प्रचंड क्षमता आहे.

मंदिराच्या उद्घाटनाचे भाजपला तीन प्रकारे राजकीय लाभ मिळवता येतील पहिला लाभ - दोन धर्मांमध्ये या परिसराविषयी प्रदीर्घ काळ सुरू असलेला वाद सोडविण्यात यश आल्याचा आणि आपल्या अनेक जाहीरनाम्यांत दिलेले आश्वासन पूर्ण केल्याचा दावा करता येईल.

दुसरा लाभ - याने पंतप्रधान मोदींच्या 'राजकीय भांडवला'त भर पडते. 'मोदी आश्वासनांची पूर्तता करतात' हे कथ्य पक्के करता येईल.

तिसरा लाभ - हे मंदिर हिंदूंसाठी अभिमानबिंदू ठरून त्यातून हिंदू धर्मियांकडून येत्या लोकसभा निवडणुकांत अधिक एकसंधपणे मतदान केले जाईल. काँग्रेस, समाजवादी पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, तृणमूल



काँग्रेस यांसारख्या विरोधी पक्षांना हिंदुत्वाच्या मुद्द्यावर अधिक लक्ष केंद्रित करणे आणि या मतपेढीला आकर्षित करण्याचे नवनवे मार्ग शोधणे भाग पडेल. कदाचित सौम्य हिंदुत्व या संकल्पनेच्या आधारे कथ्य तयार केले जाईल. कदाचित विरोधकांची मदार असलेला जातीआधारित जनगणनेचा मुद्दा या मंदिर उद्घाटनाच्या मुद्द्यापुढे निष्प्रभ ठरेल. कदाचित डीएमके किंवा नवबौद्धांतील काही पंथांसारख्या गटांकडून सनातन धर्मावर सध्या केल्या जात असलेल्या टीकेवर हिंदू धर्मीयांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटतील.अशाप्रकारे रामजन्मभूमी मंदिराचे उद्घाटन एक घटना म्हणून किंवा जनमानसात पोहोचवलेला एक संदेश म्हणून भाजपच्या राजकारणासाठी लाभदायक ठरेल. 'इंडिया' आघाडी पुढील सार्वत्रिक निवडणुकांत महत्त्वाचा मुद्दा म्हणून विकसित करू पाहत असलेल्या जातीआधारित राजकारणाचा प्रतिकार करण्यास हे मंदिर उद्घाटन सहाय्यभूत ठरेल. ही घटना 'प्रभावशाली पंतप्रधान' ही नरेंद्र मोदींची जनमानसातील प्रतिमा अधिक मजबूत करेल. त्याचा भाजपला राजकीय लाभ मिळू शकतो.लेखक अलाहाबाद येथील गोविंद वल्लभ पंत सामाजिक विज्ञान संस्थेमध्ये प्राध्यापक आहेत.

# मराठा आरक्षण मिळणार कसे?

मराठा समाजाच्या ओबीसीकरणाची मागणी गेल्या तीन दशकांत वेळोवेळी झाली आहे. सध्याच्या आंदोलनाद्वारे ती तीव्रपणे पुन्हा करण्यात येत आहे. पण स्वतंत्र आरक्षण की ओबीसीकरण, यात नक्की निवडायचे काय? प्रसाद हावळे महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाच्या मागणीचा उग्र झालेला प्रश्न सोडवायचा कसा, असा पेच सरकारसमोर उभा ठाकला आहे. गेल्या २० वर्षांत सार्वत्रिक निवडणुकांच्या आधी काही महिने हा विषय सातत्याने उफाळून येत आला आहे. त्यास त्या त्या वेळी राज्यकर्त्यांनी तात्कालिक उत्तरे शोधलीही. पण त्यामुळेच या प्रश्नाची धग वाढली आहे, हे नाकारता येणार नाही. म्हणूनच आता तात्कालिक पाणी शिंपडण्याऐवजी हे वादळ कायमस्वरूपी शमेल, यासाठीचे पाऊल सरकारने उचलायला हवे. तसा मार्ग खुद्द मराठा आंदोलकांनीच सरकारला दाखवला आहे. तो म्हणजे मराठा समाजाला सरसकट कुणबी दाखले देण्याचा. याचाच साधा अर्थ म्हणजे, मराठा समाजाला ओबीसी आरक्षणात अंतर्भूत करणे. खरे तर, या समाजाच्या ओबीसीकरणाची मागणी आजची नाही. नव्वदच्या दशकात मंडल आयोगाच्या अंमलबजावणीपासूनच मराठा समाजातील विविध घटकांमधून ही मागणी केली जात होती. आणि प्राप्त परिस्थितीत, मराठा समाजाला कायमस्वरूपी आणि न्याय्य आरक्षण देण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. ते कसे, हे पाहू. त्याआधी मराठा समाजाला २०१८ साली देण्यात आलेल्या आरक्षणाचा विचार करू. तेव्हा राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने नवा कायदा करून मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण दिले होते. ते सर्वोच्च न्यायालयात टिकले नाहीच. उलट, याबाबत निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने काही घटनात्मक मुद्दे अधोरेखित केले. त्यातील पहिला म्हणजे, इंद्रा साहनी खटल्यानुसार ५० टक्के आरक्षणमर्यादा ओलांडता येणार नाही हा. तर दुसरा मुद्दा होता मोदी सरकारने केलेल्या १०२व्या घटनादुरुस्तीचा. या घटनादुरुस्तीने राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाला वैधानिक दर्जा दिलाच, पण मागासवर्ग यादीत बदल करण्याचे राज्यांचे अधिकार काढून घेतले होते. त्यामुळे फडणवीस सरकारने अधिकार नसताना मराठा समाजाला आरक्षण दिले कसे, असा प्रश्न उपस्थित होतो. शिवाय हे आरक्षण ज्या न्या. गायकवाड आयोगाच्या अहवालावरून देण्यात आले होते, त्या अहवालातील त्रुटीही न्यायालयाने दाखवून दिल्या आहेत. आता याबाबत दुरुस्ती (क्युरेटिव्ह) याचिका राज्य सरकारने दाखल करून घेतली आहे. सध्या याच न्यायालयीन प्रक्रियेचा हवाला राज्यकर्त्यांकडून दिला जात आहे. परंतु ५० टक्क्यांची मर्यादा न ओलांडता राज्य सरकार हे आरक्षण देणार तरी कसे? दुसरे म्हणजे, हे आरक्षण 'एसईबीसी' या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासांच्या वेगळ्या प्रवर्गाअंतर्गत देण्यात आले होते. हा एसईबीसी प्रवर्ग केवळ राज्याच्या पातळीवर अस्तित्वात असल्यामुळे ओबीसींप्रमाणे सर्व आरक्षण लाभ यात नव्हते. असे असताना, आता तोच न्यायालयीन लढा पुन्हा लढून हाती काय येणार आहे? या हरणाऱ्या किंवा बिनफायद्याच्या लढाईत गुंतून मराठा समाजाने कालापव्यय तरी का करून घ्यायचा? हे ध्यानात आल्यामुळेच तर मराठा समाज सरसकट कुणबी दाखल्यांची मागणी करतो आहे. त्याबाबत राज्य सरकारने न्या. संदीप शिंदे समिती गठित केली. या समितीची कार्यकक्षा मराठवाड्यापुरती मर्यादित आहे. समितीने दिलेला आपला पहिला अहवाल सरकारने स्वीकारला आहे. त्यानुसार ज्यांच्याकडे कुणबी असण्याचे पुरावे आहेत, त्यांना कुणबी दाखले देण्याची घोषणा सरकारने केली आहे. परंतु न्या. खत्री आयोगाने सुमारे २० वर्षांपूर्वीच तशी सूचना केली होती. त्यामुळेच तर २०१४ साली तत्कालीन आघाडी सरकारने शासननिर्णय काढून इतर मागासवर्ग अर्थात ओबीसी यादीत सुधारणा करून कुणबी जातीची तत्सम जात म्हणून मराठा-कुणबी / कुणबी-मराठा यांचा समावेश करण्यात आला. त्यानुसार राज्यभर अनेक जिल्ह्यांत मराठा समाजातील बऱ्याच जणांनी कुणबी दाखले घेतले आहेत.

तेव्हापासूनच मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी तीव्र होऊ लागली होती.म्हणून २००४ साली नेमण्यात आलेल्या न्या. रमेश बापट यांच्या अध्यक्षतेखालील मागासवर्ग आयोगापुढे मराठा समाजाच्या ओबीसी आरक्षणाचा प्रश्न अजेंड्यावर होता. या न्या. बापट आयोगाने राज्यभर विविध ठिकाणी क्षेत्रपाहणी केली. त्यात मराठा आणि कुणबी यांच्यातील साम्य अधोरेखितही झाले होते. मात्र, विद्वत्तेचा आव आणत ग्रंथठोकळ्यांचा रतीब घालणाऱ्या कसबी सदस्याची ऐनवेळी केलेली नेमणूक आणि अन्य काही पूर्वग्रहदूषित दृष्टीचे सदस्य यांच्या अंतिम अहवालातील मतदानामुळे मराठा समाजाच्या ओबीसीकरणाच्या प्रक्रियेला खीळ बसली होती. त्यावरून तेव्हा झालेला वादंग आजही अनेकांच्या लक्षात असेल. न्या. बापट आयोगाचा अहवाल हा मराठा समाजावर उघड अन्याय करणाराच होता. या आयोगाचे सदस्य असलेल्या प्रा. एस. जी. देवगांवकर आणि प्रा. सी. बी. देशपांडे यांनी अहवालाला जोडलेले टिपण वाचले, तरी हे ध्यानात येईल. त्यानंतर पृथ्वीराज चव्हाण हे मुख्यमंत्री असताना, २०१४ साली आघाडी सरकारने मराठा आरक्षणासाठी नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. मराठा आणि कुणबी हे एकच आहेत, हे राणे समितीच्या अहवालातही मान्य केले होते. मात्र, ''मराठा आणि कुणबी वेगळे असून मीसुद्धा आयुष्यभर कुणबी प्रमाणपत्र घेणार नाही,'' असा दावा करणाऱ्या नारायण राणे यांना कदाचित आता ते भाजपमध्ये असल्यामुळे त्या अहवालाचा विसर पडला असावा!परंतु मराठा आणि कुणबी हे एकच असल्याचे अनेक ऐतिहासिक दाखले बऱ्याच ब्रिटिश अधिकाऱ्यांपासून वि. का. राजवाडे, इरावती कर्वे ते य. दि. फडके यांच्यापर्यंतच्या अभ्यासकांनी नोंदवून ठेवले आहेत. वास्तविक मराठा हा 'जातसमूह (कास्ट क्लस्टर)' आहे. खानेसुमारीसारख्या शासकीय प्रक्रियेत त्याचे रूपांतर 'जाती'त झालेले आहे. त्यास 'वेदोक्त-पुराणोक्त'सारख्या वादांचे आणि इतरही राजकीय-सांस्कृतिक संदर्भ आहेत. अशाच प्रक्रियेत कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या 'शासननिर्मित जाती' तयार झाल्या आहेत. गेल्या शंभर-दीडशे वर्षांत अशाप्रकारे लोकव्यवहारात, कागदपत्रांत आणि ऐतिहासिक संदर्भात मराठा समाजाचे स्वरूप वेगवेगळे राहिलेले आहे. परंतु शेती कसणारा, शेतीपूरक व्यवसाय करणारा आणि वेळप्रसंगी लष्करी पेशात मर्दुमकी गाजवणारा समाज अशी या समाजाची ओळख आहे. त्यामुळे कुणबी आणि मराठा, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या सर्व जाती वेगळ्या आहेत असे समजणे, म्हणजे ऐतिहासिक, सामाजिक सत्यापासून दूर जाणे होईल.मात्र, हे सत्य नाकारण्यामागे राजकारणाचा भाग अधिक दिसतो. उदाहरणार्थ, कुणबी जातीचा समावेश मंडल आयोगाने मागासवर्गात केला असला, तरी मराठा समाजाचा घटक असल्यामुळे कुणबी जात राज्यातील ओबीसी राजकारणाचे नेतृत्व करताना दिसत नाही. त्यामुळे राज्यातील ओबीसी राजकारणाचे धुरीणत्व माळी, धनगर, वंजारी या जातींकडे आले. राज्याच्या राजकारणात या तीन ओबीसी जाती 'माधव' म्हणून ओळखल्या जातात. या समूहाला भाजपने 'माधव पॅटर्न' म्हणून परंपरागत मतपेढी बनवले असल्याचे राजकीय तथ्य सर्वपरिचित आहे. त्यामुळे सुरुवातीला मंडल आयोगाला विरोध करण्यातून आणि मागासवर्ग यादीत समाविष्ट होण्याबाबत मराठा समाजात संभ्रम व संदिग्धता निर्माण करण्यातून कोणाचे राजकीय हित जपले जात होते, याचे उत्तर देणे अवघड नाही. त्यावेळी मराठा समाजातील तथाकथित कुलीन घटकांनी जी भूमिका घेतली, तशीच भूमिका आताच्या सरसकट कुणबी दाखल्यांच्या मागणीला विरोध करण्यासाठी घेतली




जाताना दिसते. परंतु त्यामुळे तेव्हाही मराठा समाजाचे नुकसानच झाले आणि ती भूमिका कायम ठेवली तर आताही होणार आहे.

पण सर्वसामान्य आणि गरजवंत मराठा आता तसे नुकसान होऊ देणार नाही, हे मराठा समाजाने मनोज जरांगे यांना दिलेल्या पाठिंब्यावरून दिसते. त्यामुळे राज्य सरकारने आता मराठा समाजाला सरसकट ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करण्याबाबत कार्यवाही करणे गरजेचे आहे. तसा अधिकार १०५ व्या घटनादुरुस्तीने राज्य सरकारला पुन्हा प्राप्त झाला आहे. त्यामुळे मराठा समाजाबाबत आता राज्य मागासवर्ग आयोग नव्याने प्रत्यक्षलक्ष्यी, अनुभवजन्य संख्याशास्त्रीय पुरावे जमा करू शकतो. तसा अहवाल घेऊन राज्य सरकारने मराठा समाजाचा कुणबी जातीची तत्सम जात म्हणून मागासवर्ग यादीत समावेश करावा. मात्र, सध्या मराठा आरक्षणाबाबत राज्य सरकारमधील घटक पक्षांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना एकटे पाडल्याचे दिसते. असे असले तरी मराठा समाजाबाबत त्यांची भूमिका प्रामाणिक आहे, हे त्यांनी गेल्या वर्षभरात केलेल्या अन्य उपाययोजनांतून दिसले आहे. परंतु प्रश्न राजकारणाचाच असेल, तर आरक्षणाच्या या चक्रव्यूहात मराठा समाजाचे ओबीसीकरण ही एकनाथ शिंदे यांच्यासाठी सुवर्णसंधी ठरू शकते. ते ती साधतील का?

# शिवसेनेच्या शहरप्रमूखपदी सुगंध बुकटे



चाकूर / सुशील वाघमारे :- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या चाकूर शहर पदाधिकाऱ्यांच्या माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या उपस्थितीत नुकत्याच निवडी करण्यात आल्या. चाकूर शहर प्रमुख म्हणून युवक नेतृत्व सुगंध बुकटे यांची निवड करण्यात आली.यावेळी लातूर जिल्हा प्रमूख बालाजी रेड्डी तालुका प्रमुख नंदकुमार पावर यांच्या हस्ते तालुका संपर्क कार्यालय अहमदपूर येथे नियुक्ती पत्र देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी प्रकाश हैबतपुरे, बबलू कांबळे, यांची उपस्थती होती. निवडीबद्दल मित्रपरिवार शिवसेना कार्यकर्त्यांकडून अभिनंदन केले जात आहे. चर्मकार महासंघाच्या वतीने वाघमारे शू कंपनी येथे निळकंठ वाघमारे , अजय धनेश्वर अण्णारावजी सावळे , धोंडीराम पौळकर , मोहिब पठाण,विजय धनेश्वर,विलास धनेश्वर यांनी सत्कार करून पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# एक वर्षा पासून बेपत्ता असलेल्या आणखीन ०२ मुलींना शोधण्यात यश. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक ची ऑपरेशन मुस्कान-१२ अंतर्गत कारवाई.

**काय आहे ऑपरेशन मुस्कान-१२ ?**

या मोहिमे अंतर्गत हरवलेल्या व्यक्तींचा शोध घेतला जात असून बेपत्ता व्यक्ती त्यांच्या घरच्यांना पुन्हा सूपूर्द केल्या जातात. ऑपरेशन मुस्कान-१२ म्हणजे ज्या घरातून लोक बेपत्ता झाली आहेत. त्या घरातल्या लोकांच्या चेहऱ्यावर हसू पुन्हा आणण्यास मदत करणे. ही मोहीम महाराष्ट्र पोलिसांनी सर्वात पहिल्यांदा २०१४ मध्ये राबवली होती. लातूर पोलीस दलात १ मार्च २०२२ पासून कार्यान्वित झालेल्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष (-कद्ध्ण) कडून आज पर्यंत १८ वर्षापेक्षा कमी वयाच्या ३० मुलींना शोधून त्यांना त्यांच्या नातेवाईकांना सूपूर्द केलं आहे.



लातूर :- एक वर्षा पासून बेपत्ता असलेल्या आणखीन ०२ मुलींना शोधण्यात यश. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक ची ऑपरेशन मुस्कान-१२ अंतर्गत कारवाई. याबाबत थोडक्यात हकीकत अशी की, सन २०२२-२३ मध्ये पोलीस ठाणे शिवाजीनगर, उदगीर ग्रामीण व औसा येथे अल्पवयीन मुलींचा अपहरण झाल्याच्या तक्रारीवरून भादवि कलम ३६३ प्रमाणे अनुक्रमे तीन अपहरणाचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. गुन्हे दाखल झाल्यापासून संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस नमूद मुलींचा शोध घेत होते परंतु त्या मिळून येत नव्हत्या. तसेच विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी राज्यातील हरवलेल्या बालकांच्या संदर्भात व बेपत्ता महिलांच्या शोधाबाबत निर्देश देऊन ऑपरेशन मुस्कान १२ ही शोध मोहीम दिनांक ०१/ ११/२०२३ ते ३०/११/२०२३ या कालावधीमध्ये प्रभावीपणे राबविण्याबाबत सर्व पोलीस विभागांना आदेशित केले होते. त्या वरुन पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे यांनी बऱ्याच कालावधीपासून तपासावर असलेले, आतापर्यंत मिळून न आलेल्या मुला-मुलींचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयातील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाला (-कद्ध्ण) आदेशित करून सूचना व मार्गदर्शन करून ऑपरेशन मुस्कान -१२ राबविण्यास येत आहे . पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील गोसावी यांचे मार्गदर्शनात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे महिला पोलीस उपनिरीक्षक शामल देशमुख व पोलीस उपनिरीक्षक सुभाष सूर्यवंशी हे त्यांच्या पथकामार्फत ऑपरेशन मुस्कान अंतर्गत वरील गुन्ह्याचा समांतर तपास करून अपहरण झालेल्या मुलीचा महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात जाऊन शोध घेतला तसेच सायबर सेलच्या मदतीने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून मिळालेल्या माहितीवरून पुणे , सातारा,सोलापूर, व राज्याच्या सीमालगत गावात सदर मुलींचा शोध घेऊन त्यांच्यासोबत असलेल्या इसमासह पोलिस ठाणे शिवाजीनगर, उदगीर ग्रामीण चौक येथे हजर करण्यात आले आहे. पुढील तपास संबंधित पोलीस ठाण्याचे पोलीस करीत आहेत.

ऑपरेशन मुस्कान-१२ अंतर्गत सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे महिला पोलीस उपनिरीक्षक शामल देशमुख, पोलीस उपनिरीक्षक सुभाष सूर्यवंशी, पोहेका योगी, मापोना सुदामती वंगे, पोना जाधव ,मपोना लता गिरी,चालक शंकर बुढे तसेच सायबर सेल यांनी विशेष परिश्रम घेतले आहे.

# गरजवंत मराठा बांधवाना आरक्षण मिळालेच पाहिजे या मागणी करीता रिपब्लिकन पक्षाचे आंदोलन



मुंबई / शहामत शेख :-रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री मा. ना. रामदासजी आठवले यांच्या मागणी नूसार मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे व या साठी सर्वात प्रथम लोकसभेत मागणी करत मराठा बांधवांच्या पाठीशी उभे राहत व आज ही राज्यसभा असो कींवा केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री म्हणून मराठा बांधवांच्या या लढ्याला साथ देत आंदोलन करण्याची भूमीका व जो आरक्षण लढ्याला विरोध करेल त्याला ही विरोध रिपब्लिकन पक्ष करेल ही भूमीका परखड मत जाहीर पने करत या मराठा बांधवांच्या लढ्यास कृतीशील पने साथ देण्याचे,आवाहन करताच गोरेगाव तालूका रिपब्लिकन पक्षाच्या वतीने रस्त्यावर उतरून गोरेगाव पूर्व रेल्वे स्टेशन परिसरात एकदिवसीय लाक्षणिक उपोषण व निदर्शन आंदोलन आयोजित करण्यात आले व दिवसभर हा परीसर मराठा बांधवाना आरक्षण मिळालेच पाहिजे व तूमचे आमचे नाते काय जयशिवराय जयभीमराय या घोषणांनी परिसर दूमदूमून टाकला व रिपब्लिकन पक्षाने फक्त घोषणाच नव्हे तर वरवरचा पाठिंबाच नव्हे कृतीशीलपने रस्त्यावर उतरून आंदोलनाची सूरवात गोरेगाव विभागातून केल्याची चर्चा व या आंदोलनात सहभागी झालेल्या मराठा समाजाचे गोरेगाव येथील समन्वयक व ज्यानी सोळा दिवस आझाद मैदानावर उपोषण केले होते ते निशांत बुवा सकपाळ,मराठा आघाडीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पोपटराव पडवळ,दिपक साळुंखे,व संजय विधाते या बांधवानी मत व्यक्त केले तर या आंदोलनाचे नेतृत्व मूंबई प्रदेश अध्यक्षा उषाताई रामलू यांनी केले तर प्रमूख उपस्थितीथी रिपब्लिकन पक्षाचे जेष्ठ नेते,अर्थतज्ज्ञ मा.प्रा.एस.एस.यादव,उ.प.मुंबई जिल्हाध्यक्ष प्रकाश जाधव,मूंबई प्रदेश नेते रतन आस्वारे,सिद्धार्थ पवार,रमेश जोगदंड,श्रीधर शेलार,मंगल एल.सिह, विकास गायकवाड,गणपत भोईर,भगवान धनराज,अमोल पवार, पासमंदा मंच महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष व भाजपाचे सलमान खान,उ.प.मुंबई जिल्हा उपाध्यक्ष आनंद थोरात,उ.प.मुंबई यूवा,जिल्हाध्यक्ष सुनील बोर्डे,महीला आघाडी नेत्या निलीमा सिद्धार्थ पवार,उत्तर मूंबई जिल्हाध्यक्ष महीला आघाडी निशांत मोदी,उत्तर पश्चिम मुंबई जिल्हा महीला आघाडीच्या गवळणताई बालाजी जाधव,श्रीदेवी राठोड,चरनताई भालेराव,सविताताई इंगोले,ज्योतीताई जोगदंड,कल्पनाताई बावीस्कर,अफसरबी शेख,रतनताई ढिवरे,क्रीष्णाताई गौडजी,रेणूका जाधव,उर्मिला यादव,रमाबाई खाडे,मेघाताई भोसले,विजयबाई कदम,सरोज सिंहजी,जोगेश्वरी तालूका अध्यक्ष म फूलचंद कांबळे,वर्सोवा तालूका अध्यक्ष सुनील पवार,अंधेरी तालूका नेते देविदास गायकवाड,दिंडोशी तालूका सरचिटणीस राजू पटावकर,प्रकाश वाडे,शांतीलाल देहरे,विशाल पाईकराव,अकबर सय्यद,अरूण पवार,सुनील गायकवाड,श्रीकांत शिंदे,व इतर अनेक मान्यवरानी उपस्थित राहून मराठा आरक्षण आंदोलनाला पाठींबा जाहीर करत आंदोलनात सहभाग नोंदवला तर या कार्यक्रमाचे उपस्थित राहून आयोजन करण्यात मोलाचे सहकार्य उत्तर पश्चिम मुंबई जिल्हा सचिव रमेश ए.पाळंदे,गोरेगाव तालूका जेष्ठ उपाध्यक्ष दगडू काळे, गोरेगाव यूवक आघाडी अध्यक्ष दिपक स.सहेजराव,महीला तालूका अध्यक्ष छायाताई र.राऊत,रोजगार आघाडी अध्यक्ष बबलू ढवारे,मायनॉरटी तालूका अध्यक्ष जलाल शेख,उत्तर भारतीय आघाडी अध्यक्ष संजय यादव,गोरेगाव तालूका उपाध्यक्ष संतोष घायाळ,दिनेश कांबळे,रामकृपाल पासवान,गोरेगाव विधानसभेतील वार्ड अध्यक्ष लखन प्र.पाईकराव,विजय सागरे ;दिलीप विश्वकर्मा,देविदास मोरे, मूस्तकीम शेख,व राकेशकूमार वर्मा,विजय धबाले,संतोष वारकरी,सुरेंद्र गूप्ता,बबलू शेख,सलीम शेख,रमेश आघाम,जावेद रजा, व इतर गोरेगाव मधील पदाधिकाऱ्यांसह व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले तर कार्यक्रमाचे आयोजन उत्तर पश्चिम मुंबई महीला,आघाडी जिल्हाध्यक्ष रेश्मा खान व गोरेगाव तालूका,अध्यक्ष रमेश वि.पाईकराव यांनी घेतला तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोरेगाव तालूका सरचिटणीस गूरूनाथ गायकवाड यांनी केले तर या आंदोलनाद्वारे व लेखी निवेदन वनराई पोलीस ठाण्याचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना देवून महाराष्ट्र शासनापर्यंत आपल्या मागण्या व भावना पोहचवण्याची विनंती करत व आपल्या समाजबांधवा साठी काल दिवसभर सहकार्य व उपस्थित राहून पाठींबा जाहीर करनार्या सर्व मान्यवरांचे मनपूर्वक आभार व जिथे जिथे मराठा बांधव हाक देतील तिथे तिथे उपस्थित राहून आपन कृतीशील पाठींबा देण्याचा निर्धार करण्यात येवून कार्यक्रमाचे समापन करण्यात आले

# कुडली विभाग क्र. ७ च्या वतीने विद्यार्थी गुणगौरव व स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

गुहागर :- बौद्धजन सहकारी संघ तालुका गुहागर जिल्हा रत्नागिरी कुडली विभाग क्र. ७ मुंबई आणि संलग्न सर्व शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने उत्तीर्ण विद्यार्थी गुणगौरव, धम्मचक्र प्रवर्तन दिन आणि स्नेहसंमेलन असा तिहेरी कार्यक्रम माननीय राजेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली मराठी ग्रंथ संग्रालय गावस्कर सभागृह, दादर (पू) येथे शांतता आणि सालोख्याच्या वातावरणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर प्रसंगी अध्यक्षांनी ज्योत प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरवात केली, संस्कार समितीचे अध्यक्ष संदीप गमरे आणि सहकाऱ्यांनी धार्मिक विधी सुमधुर आवाजात पार पाडला तर भदंत बोधिशील स्तवीर यांनी धम्मदेसना दिली तसेच शरद विठ्ठल यादव आणि सचिन यशवंत गमरे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. निवेदिका कुमारी योगिता हिने लक्षवेधी सूत्रसंचालन करून उपस्थितांची मने जिंकून घेतली, राजेश जाधव यांनी अत्यंत प्रभावीपणे प्रास्ताविक सादर करून कार्यक्रमाचा आलेख उंचावला. सदर प्रसंगी आयकर अधिकारी मा. शैलेंद्र गोडबोले, विश्वस्त के. सी. जाधव, प्रा. गोविंद गुंजाळ, माजी कार्याध्यक्ष संजय जाधव, बाँबे हॉस्पिटल अध्यक्षा सरिता ताई जाधव यांनी मौलिक विचार मांडून उपस्थित विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे सहकारी संघाचे सरचिटणीस संदेश गमरे, उपकार्याध्यक्ष अशोक कदम, उपाध्यक्ष सुरेश पवार, माजी चिटणीस तालुका संघ सूर्यकांत कदम, माजी अध्यक्ष तालूका संघ सिद्धार्थ पवार, कोषाध्यक्ष प्रदिप कदम, माजी कोषाध्यक्ष रामदास कळंबे, न्यायदान कमिटी अध्यक्ष शशिकांत मोहिते, पतसंस्था विश्वस्त शैलेंद्र पवार, संजीवन यादव आदी मान्यवरांनी शुभेच्छापर आपले विचार व्यक्त केले, तद्नंतर उपस्थित पाहुण्यांचे, शाखांच्या माजी कार्यकर्त्यांना अध्यक्षांच्या हस्ते ट्रॉफी, शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.




सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अजित पवार, संदीप पवार, अरविंद जाधव, नीता गमरे, सचिन सुर्वे, निलेश पवार, सुरेश सुर्वे, किशोर गमरे, चंद्रकांत जाधव आदींनी तसेच आजी माजी सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, विभागीय कार्यकारिणी, सभासद यांनी अथक परिश्रम घेऊन मोलाचे योगदान दिले त्याबद्दल त्या सर्वांचे आभार मानून अध्यक्ष राजेंद्र जाधव यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

# केजरीवालांचा ईडी कार्यालयात जाण्यास नकार; निवडणूक प्रचारासाठी रवाना

इंदूर : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल गुरुवारी सकाळी कथित मद्य घोटाळ्याच्या चौकशीसंदर्भात अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) चौकशीला उपस्थित राहिले नाहीत. त्यांनी ईडी कार्यालयात जाण्यास नकार दिला आहे. तसेच त्यांनी त्यांच्याविरुद्धचे समन्स बेकायदेशीर असून ते रद्द करण्याची मागणीही केली. त्यानंतर काही तासांनी ते मध्य प्रदेशातील निवडणूक प्रचारासाठी रवाना झाले. सिंगरौली येथे आयोजित सभेत त्यांनी दावा केला की, निवडणुकीचा निकाल लागेपर्यंत मला अटक होऊ शकते. त्यांनी आम आदमी पक्षाला मतदान करण्याचे आवाहन केले. अरविंद केजरीवाल यांनी मध्य प्रदेशातील



सिंगरौली विधानसभा मतदारसंघात पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्यासोबत रोड शोही केला.एका जाहीर सभेला संबोधित करताना केजरीवाल म्हणाले की, ते (भाजप) दिल्लीत उभे राहून केजरीवालांना अटक करू, अशी धमकी देत आहेत. त्यांनी आम्हाला अटक केली तर हरकत नाही, केजरीवाल तुरुंगात जायला घाबरत नाही. केजरीवाल यांच्या शरीराला तुम्ही अटक कराल का पण केजरीवालांच्या विचारांना अटक कशी करणार? तुम्ही या एका केजरीवालला अटक कराल. हजारो, लाखो, करोडो केजरीवालांना तुम्ही कसे अटक कराल? असे ते म्हणाले. दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणाले की, निवडणुकीचे निकाल ज्या दिवशी येतील, त्यादिवशी मी तुरुंगात असेल की बाहेर, मला माहीत नाही.

# लातूर जिल्ह्यात सरसकट दुष्काळ जाहीर करा

**महाविकास आघाडी प्रयत्नशील**


मराठा समाजाला आरक्षण मिळावे, राज्यात दुष्काळ जाहीर व्हावा, यासाठी महाविकास आघाडी प्रयत्नशील आहे. या मागण्यांचे पत्र महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने राज्यपाल श्री. रमेश बैस यांना दिले आहे, अशी माहितीही आमदार श्री. धिरज देशमुख यांनी यावेळी दिली.



लातूर : अत्यल्प पाऊस होवूनही लातूर, औसा या तालुक्यांसह लातूर जिल्ह्यात सरसकट दुष्काळ जाहीर न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे, असंतोषाचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे त्वरित लातूर, औसा या तालुक्यांसह लातूर जिल्ह्यात सरसकट दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे केली. सरकारने राज्यातील केवळ ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे. पण, या यादीत 'लातूर ग्रामीण' मतदारसंघातील लातूर आणि औसा तालुक्यांचा समावेश नाही. तसेच, रेणापूर वगळता जिल्ह्यातील अन्य तालुक्यांचाही समावेश झालेला नाही. या पार्श्वभूमीवर, 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून दुष्काळासंदर्भात घेतलेल्या निर्णयाचा पुनर्विचार करावा व लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी केली. लातूर ग्रामीण मतदारसंघातील रेणापूर तालुक्यात दुष्काळ जाहीर झाला आहे. मात्र, औसा आणि लातूर तालुक्यात दुष्काळ जाहीर झाला नाही. त्यामुळे दोन्ही तालुक्यांतील शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले आहे. अत्यल्प पाऊस झाल्याने खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. पाण्याची उपलब्धतता नसल्याने रब्बीचीही आशा मावळली आहे. जनावरांच्या चाऱ्याचा, पाण्याचा प्रश्न आत्तापासूनच निर्माण होवू लागला आहे. त्यामुळे लातूर, औसा तालुक्यांसह जिल्ह्यात दुष्काळ जाहीर होणे आवश्यक होते. याबाबतच्या घोषणेकडे डोळे लावून बसलेल्या शेतकरी बांधवांना निराशेला सामोरे जावे लागले आहे. याची सरकारने संवेदनशीलतेने दखल घेवून तातडीने लातूर जिल्ह्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करावा, अशी मागणी आमदार श्री. धिरज देशमुख यांनी केली.

# दिल्लीची खराब हवा लॉस एंजेलिसच्या प्रदूषणासारखी : एरिक गार्सेटी

नवी दिल्ली : हिवाळा सुरू होताच दिल्लीत वायू प्रदूषण वाढत आहे. भारतातील अमेरिकन राजदूत एरिक गार्सेटी यांनी राजधानीच्या प्रदूषणाची तुलना १९७०-१९८० च्या दशकातील लॉस एंजेलिसच्या प्रदूषित हवेशी केली आहे. ते म्हणाले की, राजधानीतील खराब हवा त्यांना त्यांच्या लहानपणाची आठवण करून देते. लॉस एंजेलिसमधील खराब हवेमुळे लहान मुलांना खेळण्यासाठी घराबाहेर न जाण्याचा इशारा देण्यात आला होता. अमेरिकेचे भारतातील राजदूत एरिक गार्सेटी यांनी ही माहिती दिली.दिल्लीतील नागरिक वायू प्रदूषणाच्या गंभीर संकटाचा



सामना करत असताना अमेरिकेच्या राजदूतांनी हे वक्तव्य केले आहे. दिल्लीतील हवेची गुणवत्ता अजूनही गंभीर स्थितीत आहे आणि शहरात सलग तिसऱ्या दिवशी धुके पसरले आहे. अमेरिकेचे राजदूत गार्सेटी म्हणाले की, दिल्लीत असे दिवस पाहिल्यावर त्यांना लॉस एंजेलिसमधील त्यांच्या लहानपणाची आठवण येते, जिथे अमेरिकेत हवा सर्वात जास्त प्रदूषित होती. ज्याप्रमाणे आज त्यांच्या मुलीला तिच्या शिक्षिकेने ताकीद दिली होती, त्याचप्रमाणे त्यावेळेस त्यांच्या शिक्षिकेनेही त्यांना बाहेर खेळायला न जाण्याचा इशारा दिला होता.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE